वृत्तपत्राचे नांव :– सामना
वृत्तपत्र प्रकाशनाचे ठिकाण :– मुंबई
वृत्तपत्र पान क :– 4
दिनांक :–26/05/2009

**अध्यात्म**

- मंदा आचार्य

# वेदातील विचारकण



***ऋग्वेदातील*** देवतांच्या वर्णनात प्रामुख्याने ऋषींनी मानव कल्याणासाठी त्यांची स्तुती, प्रार्थना आहेत. आत अनेक देवतांचा उल्लेख आढळतो. ही संख्या कित्येक ठिकाणी ३३ इतकी सांगितली आहे. तर फक्त एका ठिकाणी ३३०९ देवांचा उल्लेख आहे. काही ठिकाणी देवतांच्या एक किंवा दोन/दोन पिढ्यांचा उल्लेखही आढळतो. कांही ठिकाणी बृहस्पती तर काही ठिकाणी विश्वकर्मा वा हिरण्यगर्भ यांना यांचा निर्माता मानण्यात आलं आहे. परंतु या साऱ्यामधून एकच दार्शनिक विचारधारा स्पष्टपणे निदर्शनास येते की ज्या अनुसार सृष्टीच्या मुळाशी एकच आदितत्व आहे त्या आदितत्त्वाच्या अनुसार साऱ्या सृष्टीची उत्पत्ती झाली आहे. या आदितत्त्वाने पुरुषरूप धारण केलं, आत्मयज्ञ केला, हे विश्व निर्माण केलं आणि स्वतः भिन्न भिन्न देवतांच्या नामाभिधानाने प्रकट झाला. त्यातही मानवी जीवनाला पोषक असणाऱ्या अग्नी, वरुण, इंद्र, उषा या देवतांची सुंदर उपयुक्त वर्णनं आढळून येतात. देवमाता अदिती वस्तुतः सर्व देव आणि मानव यांच्यासह भूतकाळात निर्माण झालेल्या आणि भविष्य काळात निर्माण झालेल्या विद्यमान विश्वापासून भिन्न, अलग नाही. ऋग्वेदातील ऋत तत्त्व तर पृथ्वीवरील मानवी जीवनाच्या भरण-पोषणाची आधारशिला आहे. ऋग्वेदातील ऋचांच्या अर्थावरून हेच ध्वनित होते.